# खरीप ज्वारीची लागवड



**डॉ. दीपाली कांबळे**
(मो.नं. ७०३८२६५७२२)
विषय विशेषज्ञ, कृषिविद्या विभाग,
वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी
**डॉ. सचिनकुमार सोमवंशी**
कार्यक्रम समन्वयक,
कृषी विज्ञान केंद्र, बदनापूर



> योग्य वेळी पेरणी,  संकरित व सुधारित वाणांचा वापर, रासायनिक खतांचा वापर, योग्य पाणी व्यवस्थापन आणि पीक संरक्षण इत्यादी बाबींचा अवलंब केल्यास खरीप ज्वारीचे भरघोस उत्पादन मिळण्यास निश्चितच मदत होईल. त्यासाठी लेखात नमूद केलेल्या बाबींचा शेतकऱ्यांनी अवलंब करणे आवश्यक आहे.

**खरीप** ज्वारीचे भरघोस उत्पादन मिळण्यासाठी खाली नमूद केलेल्या बाबींचा शेतकऱ्यांनी अवलंब करणे आवश्यक आहे.

**जमीन** : चांगला निचरा असलेल्या व ५.५ ते ८.५ सामू असलेल्या जमिनीत हे पीक घेता येते. मध्यम काळी, चिकण-पोयट्याची जमीन खरीप ज्वारीस योग्य आहे.

**पूर्वमशागत** : एक खोल नांगरट, २-३ कुळवाच्या पाळ्या देऊन ५ ते ६ टन प्रतिहेक्टरी शेणखत किंवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे.

**पेरणीची वेळ : खरीप** - जूनचा दुसरा पंधरवडा ते जुलैचा पहिला पंधरवडा.

**रब्बी** : १५ सप्टेंबर- १५ ऑक्टोबर.

**खरीप सुधारित वाण**

**संकरित वाण** - सी.एस.एच. ५, ९, १३, १४, १६, १७, १८, २१, २३,२५, २७, ३० आणि ३५, एस.पी.एच.१६४१.

**सुधारित वाण** - एस.पी.व्ही.-४६२, सी.एस.व्ही.-१३, १५, १७, २०,२३,२७ आणि २८, पी.व्ही.के.-८०१ (१३३३), पी.व्ही.के.-४०० (पांचाली), पी.व्ही.के.-८०९ (एस.पी.व्ही.-१४७४) **गोड ज्वारी** - एस.एस.व्ही.-८४, सी.एस.व्ही.-२४ एस.एस., सी.एस.व्ही.-१९ एस.एस., सी.एस.एच.-२२ एस.एस., ए.के.एस.एस.व्ही.- २२, फुले वसुंधरा (संकरित वाण)

**रब्बी ज्वारी वाण :** हलकी जमीन - फुले अनुराधा, फुले माऊली. मध्यम जमीन - फुले सुचित्रा, फुले माऊली, फुले चित्रा, परभणी मोती, मालदांडी ३५-१. भारी जमीन - सुधारित : फुले वसुधा, सीएसव्ही १८, पीकेव्ही क्रांती. संकरित : सीएसएच १५ व १९.

**बागायतीसाठी**- फुले रेवती, फुले वसुधा, सी.एस.व्ही. १८, सी.एस.एच. १५ व १९. **हुरड्यासाठी**- फुले उत्तरा, फुले मधुर. **लाह्यांसाठी**- फुले पंचमी. **पापडासाठी** - फुले रोहिणी.

बियाणे: प्रतिहेक्टरी १० किलो सुधारित बियाणे वापरावे.

**बीजप्रक्रिया** : पेरणीपूर्वी ३०० मेश गंधक ४ ग्रॅम प्रतिकिलो याप्रमाणे बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर प्रति १० किलो बियाण्यावर प्रत्येकी २५० ग्रॅम ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणाऱ्या जिवाणू खताची बीजप्रक्रिया करावी.

पेरणीचे अंतर: ४५ X १५ सें.मी.

**आंतरमशागत** : खरीप- पहिली विरळणी पेरणीनंतर १०-१२ दिवसांनी, दुसरी विरळणी पेरणीनंतर २०-२२ दिवसांनी करावी. विरळणी नंतर १.८० लाखापर्यंत योग्य रोपांची संख्या ठेवावी. दोन खुरपण्या व दोन कोळपण्या (पेरणीनंतर ४५ दिवसांपूर्वी) कराव्या. शक्य असल्यास अट्रॅझिन ४०० ग्रॅम प्रतिएकर पेरणीनंतर द्यावे परंतु उगवणीपूर्वी फवारणी करावी.

**आंतरपिके व क्रमवार पिके**

* पट्टा पद्धतीने तूर हे आंतरपीक २:१ या प्रमाणात घ्यावे. दोन ओळी ज्वारीच्या व एक ओळ तुरीची किंवा दोन पांभरी ज्वारीच्या व एक पांभर तुरीची पेरावी. तसेच तुरीऐवजी मूग, उडीद व चवळी यासारखी आंतरपिके देखील घेता येतात.

* तुरीचे आंतरपीक ३:३ किंवा ४:२ ओळी या प्रमाणात घ्यावे. संकरित ज्वारीच्या कापणीनंतर कमीतकमी मशागत करून करडईचे दुबार पीक घ्यावे.

**खत व्यवस्थापन** : हलकी जमीन ४०:४०:४० किलो नत्र, स्फुरद, पालाश, संपूर्ण स्फुरद, पालाश पेरणीवेळी, नत्र अर्धे पेरणीवेळी आणि ४० किलो- अर्धे पेरणीनंतर एक महिन्याने.

**पाणी व्यवस्थापन** : पिकाचा जोमदार वाढीचा काळ (२०-२५ दिवस), पीक पोटरीत येण्याचा काळ (५०-७५ दिवस), फुलोऱ्यात येण्याचा काळ (८०-९० दिवस) व दाणे भरण्याचा काळ (९५-१०० दिवस) या चार अवस्थांत जरुरीप्रमाणे शक्य झाल्यास पाणी द्यावे.

**रोगांचा बंदोबस्त**

१. **करपा** : या रोगामुळे पाने करपतात व नंतर जळतात. यासाठी कॉपर ऑक्सिक्लोराईड ४ ग्रॅम प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. २. **काणी** : काणीच्या नियंत्रणासाठी ज्वारीच्या १ किलो बियाण्यास पेरणीपूर्वी गंधकाची (३०० मेश पोत) भुकटी ४ ग्रॅम प्रतिकिलो याप्रमाणे बियाणे बीजप्रक्रिया करावी. झिप्री किंवा काळा गोसावी या रोगाची झाडे दिसताच नष्ट करावी. त्यामुळे रोगाचा प्रसार थांबण्यास मदत होईल. ३. दाण्यावरील बुरशी (ग्रेनमोल्ड) : या रोगाच्या नियंत्रणासाठी थायरम ७५% डब्लू.एस. २० ग्रॅम किंवा दाणे पक्व अवस्थेत असताना व तिसरी फवारणी पाऊस असल्यास करावी.

**किडींचा बंदोबस्त**

१. खोडकीड - पेरणी वेळेवर करावी. नियंत्रणासाठी निंबोळी तेल ३ मि.लि. प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी किंवा क्विनॉलफॉस (५% जीआर) दाणेदार ६ किलो प्रतिएकरी पोंग्यात टाकावे.

२. खोडमाशी - प्रादुर्भाव दिसून येताच निंबोळी तेल ३ मि.लि. किंवा क्विनॉलफॉस २५ % ई.सी. १५ मि.लि. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून उगवणीनंतर ७ दिवसांनी फवारणी करावी. दुसरी फवारणी एक आठवड्याने करावी.

३. लष्करी अळी व कणसातील अळी : या किडीच्या नियंत्रणासाठी मॅलॅथिऑन ५ % डी.पी. (भुकटी) प्रतिहेक्टरी २० किलो या प्रमाणात वारा शांत असताना धुरळणी करावी.

**काढणी व उत्पादन** : कणसाचा दांडा पिवळा झाला, कणसाच्या खालील भागातील दाणे टणक झाले, कणसातील दाण्याचा खालचा भाग काळा झाला की पिकाची काढणी करावी. काढणीनंतर ८-१० दिवस वाळवून मळणी करावी.

**खरीप** : सुधारित वाण: २५ ते ३० क्विंटल/हेक्टरी

**संकरित वाण** : ४० ते ४५ क्विंटल/हेक्टरी. ■